(7)



इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या
४वार दिनांक २५.५.९३ रोजी संपन्न झालेल्या
७ व्या बैठकीचा स्थायी करण्यात आलेला कार्यवृत्तांत

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.

मंगळवार दि. २५.५.९३ रोजी झालेल्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या ७ व्या बैठकीचे कार्यवृत्तांत.

मंगळवार दि. २५.५.९३ रोजी सकाळी ११.०० वा. मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ७ वी बैठक गृहनिर्माण भवनाच्या चौथ्या मजल्यावरील सभागृहात संपन्न झाली. या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १]डॉ. शंकर वा. मटकर. | सभापती. |
| २]श्री. हेमराज शहा. | उप सभापती. |
| ३]श्री. पं. दो. वाणी. | मुख्य अधिकारी. |
| ४]श्री. यादवराव कांबळे<br>उपसचिव, गृहनिर्माण व<br>विशेष सहाय्य विभाग. | सदस्य. |
| ५]श्री. पोतदार,<br>प्रमुख अभियंता, मुंबई म. न. पा.<br>यांचे प्रतिनिधी. | सदस्य. |
| ६]श्री. रॉकी फ्रास्टो. | सदस्य. |
| ७]श्री. विवेक भार्तु | सदस्य. |
| ८]श्री. महम्मद फारुख मन्सुरी. | सदस्य. |
| ९]श्री. व्ही. बी. परसकर | सदस्य. |
| १०]श्री. शंकरराव पिटला. | सदस्य. |
| ११]श्री. महम्मद आजम खान. | सदस्य. |
| १२]श्री. गजेंद्र लष्करी | सदस्य, |
| १३]श्री. श्रीकांत पाटील. | सदस्य. |
| १४]श्री. चेतन शहा. | सदस्य. |
| १५]उपकर निर्धारक व संकलक यांचे<br>प्रतिनिधी. | निमंत्रीत. |

श्री. कमलाकर शर्मा, सदस्य यांनी सभेस उपस्थित राहू शकत नाही असे दि. २९.४.९३ च्या पत्राद्वारे कळविले आहे.

मा. सभापती डॉ. शंकर वामन मटकर, यांचे अध्यक्षतेखाली बैठकीस प्रारंभ झाला. प्रारंभी मा. सभापती, उपसभापती, सदस्य अधिकारी व निमंत्रीत यांचे स्वागत करण्यांत आले. बैठकीचे नियमीत कामकाज सुरु होण्यापूर्वी मा. सभापती डॉ. शं. वा. मटकर यांनी सभागृहास माहिती दिली की मंडळाने ५ व्या बैठकीत संमत केलेल्या पुनर्रचित इमारतीमधील अनधिकृत गाळेधारकांना नियमित करण्या संबधीचे शुल्क रु. १५००० ते रु. २५००० असावे या ठरावाचा पाठपुरावा केल्याने महाराष्ट्र शासनाने अनधिकृत गाळेधारकांना नियमित करण्या संबधी शुल्क मंडळाच्या ठरावाप्रमाणेच आकाराचे असा निर्णय घेतला आहे.. या निर्णयाचे सर्वांनी स्वागत केले. उपसचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग यांनी प्रतिपादन केले की या पूर्वीच्या मंडळाच्या बैठकांच्या तारखा विधानसभा प्रश्नोत्तराच्या दिवशी

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.

मंगळवार दि. २५. ५. ९३ रोजी झालेल्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या ७ व्या बैठकी चे कार्यवृत्तांत. ५६३

मंगळवार दि. २५. ५. ९३ रोजी सकाळी ११. ०० वा. मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ७ वी बैठक गृहनिर्माण भवनाच्या चौथ्या मजल्यावरील सभागृहात संपन्न झाली. या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १]डॉ. शंकर वा. मटकर. | सभापती. |
| २]श्री. हेमराज शहा. | उप सभापती. |
| ३]श्री. पं. दो. वाणी. | मुख्य अधिकारी. |
| ४]श्री. यादवराव कांबळे<br>उपसचिव, गृहनिर्माण व<br>विशेष सहाय्य विभाग. | सदस्य. |
| ५]श्री. पोतदार,<br>प्रमुख अभियंता, मुंबई म. न. पा.<br>यांचे प्रतिनिधी. | सदस्य. |
| ६]श्री. रॉकी क्रास्टो. | सदस्य. |
| ७]श्री. विवेक भार्तु | सदस्य. |
| ८]श्री. महम्मद-फारुख मन्सुरी. | सदस्य. |
| ९]श्री. व्ही. बी. परसकर | सदस्य. |
| १०]श्री. शंकरराव पिटला. | सदस्य. |
| ११]श्री. महम्मद आजम खान. | सदस्य. |
| १२]श्री. गजेंद्र लष्करी | सदस्य, |
| १३]श्री. श्रीकांत पाटील. | सदस्य. |
| १४]श्री. चेतन शहा. | सदस्य. |
| १५]उपकर निर्धारक व संकलक यांचे<br>प्रतिनिधी. | निमंत्रीत. |

श्री. कमलाकर शर्मा, सदस्य यांनी सभेस उपस्थित राहू शकत नाही असे दि. २९. ४. ९३ च्या पत्राद्वारे कळविले आहे.

मा. सभापती डॉ. शंकर वामन मटकर, यांचे अध्यक्षतेखाली बैठकीस प्रारंभ झाला. प्रारंभी मा. सभापती, उपसभापती, सदस्य अधिकारी व निमंत्रीत यांचे स्वागत करण्यात आले. बैठकीचे नियमीत कामकाज सुरु होण्यापूर्वी मा. सभापती डॉ. शं. वा. मटकर यांनी सभागृहास माहिती दिली की मंडळाने ५ व्या बैठकीत संमत केलेल्या पुनर्रचित इमारतीमधील अनधिकृत गाळेधारकांना नियमित करण्या संबंधीचे शुल्क रु. १५००० ते रु. २५००० असावे या ठरावाचा पाठपुरावा केल्याने महाराष्ट्र शासनाने अनधिकृत गाळेधारकांना नियमित करण्या संबधी शुल्क मंडळाच्या ठरावाप्रमाणेच आकारावे असा निर्णय घेतला आहे.. या निर्णयाचे सर्वांनी स्वागत केले. उपसचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग यांनी प्रतिपादन केले की, या पूर्वीच्या मंडळाच्या बैठकांच्या तारखा विधानसभा प्रश्नोत्तराच्या दिवशी

असल्यामुळे त्यांना यापूर्वीच्या बैठकांना उपस्थित रहाणे शक्य झाले नव्हते. विधानसभेच्या कालावधीतील बैठकांच्या तारखा निश्चित करण्यापूर्वी त्यांचेशनी चर्चा करावी, अशी त्यांनी विनंती केली व ती मान्य करण्यांत आली. त्यानंतर बैठकीच्या नियमित कामास सुरुवात झाली.

बाब क्र. ७. १

विषय:– दि. २८. ४. ९३ रोजी झालेल्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या ६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

या वृत्तांतावर सविस्तर चर्चा झाली. पृष्ठ क्र. १४७ वर ८ व्या क्र. वर १९९२–९३ ऐवजी १९९१–९२ अशी दुरुस्ती सुचविण्यांत आली. ही दुरुस्ती मान्य करण्यांत आली. सविस्तर चर्चेअंति वरील दुरुस्तीसह दि. २८. ४. ९३ रोजी झालेल्या ६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्यांत आला.

बाब क्र. ७. २.

पुनर्बांधणी योजना : नावाचे प्रस्ताव.

१]२४२ जी, बोरी चाळ, आदम मिस्त्री लेन फ/द विभाग , मुं. १२. या इमारतीस "बसेरा" हे नांव देण्याचा प्रस्ताव पृष्ठ क्र. २९ वर सादर केला आहे. चर्चेच्या वेळी सदस्यांनी प्रश्न विचारला की, दि. १५. १०. ९२ रोजी इमारतीस निवास परवाना असताना या इमारतीमधील गाळ्यांचे वितरण अद्याप का झालेले नाही? या संदर्भात मुख्य अधिकारी यांनी चौकशी करुन गाळे वितरणाचे लवकरच पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर सविस्तर चर्चेअंती इमारतीस "बसेरा " हे नांव देण्याचा प्रस्ताव एकमताने मंजुर करण्यांत आला.

२]मणीलाल मॅन्शन, २०९, भाडकमकर मार्ग "ड" विभाग या पुनर्रचित इमारतीस "इंद्रप्रस्थ" हे नांव देण्याचा प्रस्ताव.

या विषयाची टिपण्णी पृष्ठ क्र. ३१ वर सादर केली आहे. या विषयावर सविस्तर चर्चा होउन सदर इमारतीस "इंद्रप्रस्थ" हे नांव देण्याचा प्रस्ताव एकमताने मंजुर झाला.

निर्णय क्र. ७/४४.

पुनर्रचित इमारतींना पुढील प्रमाणे नांव देण्याचे प्रस्ताव एकमताने मंजुर करण्यांत आले.

| पुनर्बांधणी योजना. | नांव. |
|---|---|
| १]२४२ जी, बोरी चाळ, आदम मिस्त्री लेन, फ/द विभाग, परळ. | बसेरा. |

२)मणीलाल ऍन्थान,                    इंद्रप्रस्थ.
३०९, भाडकमकर मार्ग,
"ड" विभाग, मुंबई.

<u>बाब क्र. ७/३.</u>

विषय:- "अ" वर्गातील उपकरपात्र इमारतींच्या पुनर्विकासासाठी "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याविषयी.

या विषयीचे प्रस्ताव पृष्ठ क्र. ३३ ते ११५ वर व पुरवणी कार्यसूचीत पृष्ठ क्र. ३१३ व ३२७ वर सादर केले आहेत.

सादर केलेल्या प्रस्तावांवर सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती पुढील प्रस्तावांना ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचा निर्णय एकमताने देण्यांत आला.

| प्रस्ताव. | पृष्ठ क्र. |
|---|---|
| १)भूकर पहाणी क्र. ७/३८० मलबार हिल विभाग प्लॉट क्र. ३३ अे या मालमत्तेवरील इमारत क्र. १२ क "स्नेह कुटीर" या उपकरपात्र इमारतीचा पुनर्विकास करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करणे. | ३७ |
| २)भूकर पहाणी क्र. ६/४९२ मलबार हिल विभाग या मालमत्तेवरील "गंगा कुंज" ९-९अे लॅबरनम रोड गांवदेवी इस्टेट या उपकरपात्र इमारतीच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करणे. | ८५ |
| ३)भूकर पहाणी क्र. ८०४/१० माटुंगा विभाग या मालमत्तेवरील प्लॉट क्र. ७२०, माटुंगा इस्टेट येथील इमारत क्र. ४, ४ अे, ४, ४बी टिळक रोड, १९-१९ बी रोड या उपकरपात्र इमारतीच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करणे. | १०९ |
| ४)भूकर पहाणी क्र. २७४/१० माटुंगा विभाग भूखंड क्र. ३५८, दादर माटुंगा इस्टेट या मालमत्तेवरील ९ आश्विन विला, तेलंग मार्ग, या उपकरपात्र इमारतीच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करणे. | ३१३ |

(१०२)

पुढील प्रस्तावांच्या संदर्भात सादर केलेल्या यादी प्रमाणे इमारतीत रहिवासी रहात आहेत किंवा नाहीत या विषयाची शंका सदस्यांनी उपस्थित केली. सविस्तर चर्चेअंती असा निर्णय घेण्यांत आला की खाली उल्लेख केलेल्या प्रस्तावातील इमारतींना सदस्यांच्या समितीने भेट देऊन इमारती मधील रहिवाशांची यादी, इमारतींची सद्यःस्थिती, घरमालकाने/विकासकाराने रहिवासी/भाडेकरूंशी केलेली करारपत्रे यांची छाननी करून अहवाल शक्यतो १५ दिवसांत मुख्य अधिकारी यांना सादर करावा. समितीच्या शिफारशी नुसार यांनी प्रस्तावांच्या संदर्भात पुढील कार्यवाही करावी.

| अनु. प्रस्ताव. | समितीच पहाणीची तारीख. |
|---|---|
| १) भूकर पहाणी क्र. १३५६ माहीम विभाग या शालस्तीवरील इमारत क्र. १४-१४ अ "अजीज मंजील" वीर सावरकर मार्ग या उपकरपात्र इमारतीचा पुनर्विकास करणे. पृष्ठ क्र. ३३. | श्री. चेतन शहा. श्री. श्रीकांत पाटील. श्री. आजम खान. दि. ३ जून ९३ सकाळी ११ वा. |
| २) भूकर पहाणी क्र. ४५० लोअर परळ विभाग, या शालस्तीवरील ११२-१२० "गॉड गिफ्ट" ना. म. जोशी मार्ग या उपकरपात्र इमारतीचा पुनर्विकास करणे. पृष्ठ क्र. ५३. | श्री. शंकरराव पिटला. श्री. गजेंद्र लष्करी. श्री. विवेक भार्तू. श्री. रॉकी क्रास्टो. दि. ४ जून ९३ रोजी सकाळी ११ वा. |

मुंबई महानगरपालिकेचे प्रतिनिधी श्री. पोतदार यांनी निदर्शनास आणून दिले आहे की "गॉड गिफ्ट" ही इमारत धोकादायक असून या इमारतीचा काही भाग पाडून टाकण्यांत आला आहे. सदर वास्तुस्थिती लक्षांत घेता समितीने आपला अहवाल शक्यतो लवकर सादर करावा अशी सूचना करण्यांत आली.

| | |
|---|---|
| ३) भूकर पहाणी क्र. ८०६, मलबार हिल. विभाग, इमारत क्र. २०, महालक्ष्मी मंदीर मार्ग, मुंबई ६ या उपकरपात्र इमारतीचा पुनर्विकास. पृष्ठ क्र. ९३. | श्री. हेमराज शहा. श्री. फारूख मन्सुरी. श्री. रॉकी क्रास्टो. दि. २८.५.९३ रोजी सकाळी ११ वा. |
| ४) भूखंड क्र. ४६०, नगर रचना योजना क्र. ४, माहीम विभाग इमारत क्र. १० बी, दादर गल्ली या उपकरपात्र इमारतीचा पुनर्विकास. पृष्ठ क्र. १०१ | डॉ. शं. वा. मटकर. श्री. व्ही. बी. वरसकर. श्री. शंकरराव पिटला. दि. ५ जून ९३ सकाळी ११ वा. |

पृष्ठ क्र. ७५ वरील अंतीम भूखंड क्र. १२८१ नगरयोजना क्र. ४ माहिम विभाग इमारत क्र. १३ बी, १३अ, ४२ बी वार्यंगणकर वाडी, प्रभादेवी मुंबई या मालमत्तेच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावासंदर्भात मालमत्ताधारक श्री. मनोहर वार्यंगणकर यांचे दि. २१.५.९३ चे पत्र सभेपुढे सादर करण्यांत आले. या पत्रात केलेल्या विनंतीनुसार सदर प्रस्ताव प्रलंबीत ठेवण्यांत आला.

पृष्ठ क्र. ३२७ वर भूकर पहाणी क्र. ३७० गिरगांव विभाग येथील पिंपळवाडी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेचा पुनर्विकास करण्याविषयीचा प्रस्ताव सादर केला आहे. या संदर्भात मुख्य अधिकारी यांनी स्पष्टीकरण केले की सदर मालमत्ता मंडळाने संपादित केली असून या जागी पुनर्बांधणी योजना राबविल्यास सुमारे ५०० अतिरीक्त गाळे मंडळास उपलब्ध होऊ शकतात. प्रस्तावा प्रमाणे पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान केल्यास मंडळास एकही अतिरीक्त गाळा अतिरीक्त उपलब्ध होणार नाही. अशा परिस्थितीत मंडळातर्फे पुनर्बांधणी योजना राबवावी किंवा पुनर्विकासासाठी ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करणे यासंबंधीचा निर्णय न्यायालयास कळविणे आवश्यक असल्याने मंडळापुढे निर्णयासाठी प्रस्ताव सादर केला आहे असे प्रतिपादन मुख्य अधिकारी यांनी केले. या प्रस्तावाचा सविस्तर अभ्यास करण्यासाठी सदस्यांना थोडा अवधी मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर प्रस्ताव पुढील बैठकीत चर्चेसाठी आणावा अशी सूचना सदस्यांनी केली. विधी सल्लागार/ प्राधिकरण यांचेशी चर्चा केल्यानंतर या प्रस्तावावर पुढील बैठकीत चर्चा करावी, असे सर्वानुमते ठरले.

पुढील प्रमाणे ठराव एकमताने मंजुर करण्यांत आला.

निर्णय क्र. ७/४५

पुढील प्रमाणे मालमत्तेवरील उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याच्या प्रस्तावांना एकमताने मंजुरी देण्यांत आली.

१) भूकर पहाणी क्र. ७/३८० मलबार हिल विभाग प्लॉट नं. ३३ ए या मालमत्तेवरील इमारत क्र. १२ क स्नेह कुटीर या इमारतीचा पुनर्विकास.

२) भूकर पहाणी क्र. ६/४९२ मलबार हिल विभाग या मालमत्तेवरील "गंगा कुंज" ९-९ ए लॅबरनाम रोड, गांवदेवी इस्टेट या इमारतीचा पुनर्विकास.

३) भूकर पहाणी क्र. ८०४/१० माटुंगा विभाग या मालमत्तेवरील प्लॉट क्र. ७२०, माटुंगा इस्टेट येथील इमारत क्र. ४, ४अे, ४-४बी टिळक रोड, १९-१९ बी रोड या उपकरपात्र इमारतींचा पुनर्विकास.

४) भूकर पहाणी क्र. ३७४/१० माटुंगा विभाग . भूखंड क्र. ३४९ दादर माटुंगा इस्टेट या मालमत्तेवरील ९ आश्विन व्हिला, तेलंग मार्ग या इमारतीचा पुनर्विकास.

ठराव क्र. ७/४६ /

पुढील मालमत्तेवरील उपकरपात्र इमारतींच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावा-

संदर्भात सदस्यांच्या समितीने पहाणी करुन शिफारस केल्यानंतर पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला. समितीच्या शिफारशीनुसार मुख्य अधिकारी यांनी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याची कार्यवाही करावी असाही निर्णय एकमताने घेण्यांत आला.

१]भूकर पहाणी क्र. १३५६ माहिम विभाग या मालमत्तेवरील इमारत क्र. १४-१४-ए अजिज मंझील, वीर सावरकर मार्ग या इमारतीचा पुनर्विकास.

२]भूकर पहाणी क्र. ४५० लोअर परळ विभाग या मालमत्तेवरील ११२-१२० ग्रॅंड गिफ्ट, ना.म.जोशी मार्ग या इमारतीचा पुनर्विकास.

३]भूकर पहाणी क्र. ८०६ मलबार हिल विभाग, इमारत क्र. २० महालक्ष्मी मार्ग, मुंबई ६ या इमारतीचा पुनर्विकास.

४]भूखंड क्र. ४६०, नगररचना योजना क्र. ४, माहिम विभाग, इमारत क्र. १० बी दादर गल्ली या इमारतीचा पुनर्विकास.

बाब क्र. ७/५.

विषय:- उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी देणे.

उपकर इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरीचे प्रस्ताव तसेच दुरुस्ती अंदाजपत्रकांना सुधारीत प्रशासकीय मंजुरी देण्यासंबधीचे प्रस्ताव पृष्ठ क्र. ११९ ते २१७ व २३५ ते ३११ वर सादर केले आहे. मुख्य अधिकारी यांनी या संदर्भात स्पष्टीकरण केले की दुरुस्ती खर्चासाठी साधारणपणे दरमहा रु.२ कोटीचा निधी उपलब्ध गृहीत धरुन प्राधान्य यादीप्रमाणे दुरुस्ती अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी देणे उचित होईल. गेल्या महिन्यात सुमारे रु.१.३६ कोटी एवढ्या खर्चाच्या दुरुस्ती अंदाजपत्रकांना मंजुरी दिली आहे. या बैठकीत प्रस्तावित केलेल्या अंदाजपत्रकांचा खर्च साधारणपणे रु.२.६२ कोटी एवढा होणार आहे. वरील प्रमाणे आर्थिक स्थिती लक्षात घेता प्रस्तावित केलेल्या सर्व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी देता येईल असे त्यांनी प्रतिपादन केले. या चर्चेच्या वेळी सदस्यांनी तक्रार केली की मंडळाने मंजुरी दिलेली दुरुस्ती कामे योग्य प्रकारे होत नाहीत. काही कामांना वास्तुशास्त्रज्ञ भेट देत नाहीत तर ठेकेदार सब कॉंट्रॅक्टरला काम देतात. मंडळाचे अधिकारी रहिवाशांना योग्य प्रकारची वागणूक देत नाहीत. या संदर्भात मा.सदस्य श्री.शंकरराव पिटला यांनी दिलेल्या तक्रारीच्या संदर्भात मुख्य अधिकारी यांनी सविस्तर चौकशी करुन संबंधितांवर आवश्यक ती कारवाई करण्याचे मान्य केले. शासनाचे उपसचिव श्री.या.डी. कांबळे यांनी निदर्शनास आणून दिले की, दुरुस्ती

व पुनर्बांधणीसाठी शासनाकडे रु. ३३.०० कोटीचा निधी उपलब्ध असून प्राधिकरणाने मागणी न केल्याने शासनास हा निधी वितरीत करणे शक्य झाले नाही. सविस्तर चर्चेअंती मुख्य अधिकारी यांनी निधीची मागणी करण्याच्या संदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्याचे मान्य केले. दंगल व बॉम्बस्फोटांत क्षतिग्रस्त झालेल्या इमारतींच्या दुरुस्तीची कामे निधी अभावी अर्धवट अवस्थेत आहेत ही वस्तुस्थिती सदस्यांनी शासनाच्या उपसचिवांच्या निदर्शनास आणून दिली व श्री राजेन्द्र [illegible] व अन्य सदस्यांनी हा निधी उपलब्ध करण्यासाठी, त्यांनी वैयक्तीक स्तरावर प्रयत्न करावेत अशी विनंती केली. प्रत्येक परिमंडळात प्रगतीपथावर असलेली दुरुस्तीची ५ कामे व सुरु होणारी ५ कामे, त्यांच्या अंदाजपत्रकांसह संबंधीत सदस्यांना दाखवावीत व त्यांच्या शंकेचे निरसन संबधित उपमुख्य अभियंता यांनी करुन त्याचा अहवाल पुढील बैठकीत सादर करावा अशी सूचना करण्यांत आली व ही सूचना सर्वानुमते मान्य करण्यांत आली. सविस्तर चर्चेअंती परिशिष्ठ "अ" मधे दर्शविलेल्या ४१ इमारतींच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी देण्याचा व १२ इमारतींच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकांना सुधारीत प्रशासकीय मंजुरी देण्याचा निर्णय घेण्यांत आला.

ठराव क्र. ७/४८.

परिशिष्ठ "अ" मधे दर्शविलेल्या ४१ इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी देण्याचा व परिशिष्ठ "ब" मधे दर्शविलेल्या १२ इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या अंदाजपत्रकांना सुधारीत प्रशासकीय मंजुरी देण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

बाब क्र. ७/२.

विषय:- इमारत क्र. ९४-९८-१०४-१०६-१०८ तात्या घारपुरे पथ "डी" विभाग या पुनर्बांधणी योजनेच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी देण्याविषयी.

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र. २२३ वर सादर केला आहे. या प्रस्तावाची सविस्तर माहिती उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांनी दिली. या विषयावरील चर्चेच्या वेळी मा. सदस्य श्री. शंकरराव पिटला यांनी तक्रार केली की या इमारतींमधील रहिवाशांना संक्रमण शिबिरात प्रयत्न करुनही पर्यायी जागा उपलब्ध होत नाही. सदस्यांनी प्रश्न विचारला की या योजनेतील काही रहिवाशांना "परिश्रम" या पुनर्रचित इमारतीत गाळे कसे वितरीत झाले? या संदर्भात सविस्तर चौकशी करुन कार्यवाही करण्याचे मुख्य अधिकारी यांनी मान्य केले. सविस्तर चर्चेअंती या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

ठराव क्र. ७/४९.

इमारत क्र. ९४-९८-१०४-१०६-१०८ तात्या घारपुरे पथ "डी" विभाग या इमारतीच्या पुनर्बांधणीच्या प्रस्तावित रु. ५५८३०८४/- [रुपये पंचावन्न लक्ष त्र्याऐंशी हजार व चौऱ्याऐंशी रु. फक्त] एवढया खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

बाब क्र. ७/६.

विषय:- पावसाळ्यापूर्वी सर्वेक्षणांत आढळलेल्या धोकादायक इमारती.

पूर्वपावसाळी सर्वेक्षण केल्यानंतर धोकादायक आढळलेल्या ३० उपकरप्राप्त इमारतींची यादी सभागृहापुढे सादर करण्यांत आली. यापैकी ४ इमारती पुनर्बांधणी साठी संपादीत केलेल्या आहेत. महानगर पालिकेचे प्रतिनिधी श्री. पोतदार यांनी निदर्शनास आणून दिले की तेलीवाली चाळ, डॉ. आंबेडकर मार्ग या इमारतीतील रिकाम्या गाळ्यांत काही अनधिकृत व्यक्ती रहात असून ही इमारत अत्यंत धोकादायक अवस्थेत आहे. या इमारतीची संबधित अधिकाऱ्यांनी पहाणी करुन अनधिकृत रहिवाशांना काढण्याची कार्यवाही विना विलंब करावी अशी सूचना देण्यांत आली. या विषयावर सविस्तर चर्चा झाली. परिशिष्ठ "क" मधील इमारतींचा धोकादायक भाग पाडून टाकणे, धोकादायक भागास टेकू लावणे, इमारतीमधील रहिवाशांना संक्रमण शिबिरात पर्यायी जागा देऊन इमारत पाडून टाकणे. इत्यादी कार्यवाही युध्दपातळीवर करण्यांत यावी असे आदेश संबधितांना देण्यात आले.

बाब क्र. ७/४.

विषय:- अनुपालन अहवाल.

अनुपालन अहवाल पृष्ठ क्र. ११३, ३२१ व ३२३ वर सादर केला आहे. त्यावर चर्चा झाली. झालेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यांत आली.

बाब क्र. ७/६.

विषय:- अध्यक्षांच्या परवानगीने अन्य विषयावर चर्चा.

१] संक्रमण शिबीरांतील रिकामे गाळे व पुनर्रचित इमारतीमधील रिकामे गाळे दर्शविणारी माहिती दर बैठकीत सादर करावी अशी सूचना सदस्यांनी केली. ही सूचना मान्य करण्यांत आली.

२] दुरूस्ती कामांच्या संदर्भात कार्यकारी अभियंता यांनी वास्तुशास्त्रज्ञांची मासीक आढावा बैठक घ्यावी. रहिवाशांमधील मतभेदामुळे दुरूस्ती कामांत अडथळे येत असल्यास दुरूस्ती काम सुरु

करण्यासाठी संबंधित सदस्यांचे सहकार्य घ्यावे, अशी सूचना मुख्य अधिकारी यांनी संबंधितांना दिली.

३) पुनर्रचित झालेल्या इमारतीस निवास परवाना व जलजोडणी मिळाल्यानंतर अनेक महिने गाळ्यांचे वितरण होत नाही व गाळ्यांच्या अनधिकृत व्यक्तींकडून गैरवापर होतो असे सदस्यांनी निदर्शनास आणून दिले. इमारतीस जलजोडणी मिळाल्यानंतर त्वरीत गाळेवाटप व्हावे या दृष्टीने संबंधित अधिकारी व कार्यालये यांनी समन्वय साधावा. अशी सूचना करण्यांत आली व ही सूचना मान्य करण्यांत आली.

४) पुढील बैठक दि. २४ जून १९९३ रोजी सकाळी ११.०० वा. आयोजित करावी असे ठरले.

माननीय सभापती, उपसभापती व सदस्यांचे आभार मानल्यानंतर अध्यक्षांच्या परवानगीने सभा समाप्त झाल्याचे जाहीर करण्यांत आले.

सभापती,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.

## परिशिष्ठ "अ"

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दि. २५.५.९३ रोजी झालेल्या ७ व्या बैठकीत मंजुरी दिलेल्या दुरुस्ती अंदाजपत्राकाची यादी.

| क्र. इमारतीचे नांव. | विभाग. | पृ.क्र. |
|---|---|---|
| **दक्षिण परिमंडळ.** | | |
| १]२२८ पेरीन नरीमन स्ट्रीट | अ | १३७ |
| २]१७९-१७९ अ अब्दुल रेहमान स्ट्रीट. | ब | ११९ |
| ३]४४ मेमनवाडा रोड. | ब | १५१ |
| ४]६ तांडेल x लेन. | ब | १६१ अ |
| ५]४९-५५ शेरीफ देवजी स्ट्रीट | ब | १६५ |
| ६]२२-२४-२६ उमरखाडी x रोड झुबेदा बिल्डींग. | ब | १६९ |
| ७]१२-१४ ओल्ड बेंगालीपुरा x लेन. | ब | १७३ |
| ८]१६० काविकर स्ट्रीट | ब | २५७ |
| ९]९४ काविकर स्ट्रीट | ब | २५९ |
| १०]३८ तांडेल स्ट्रीट[उत्तर]शाहजादा बिल्डींग | ब | २८१ |
| ११]४ डोंगरी x लेन | ब | २८७ |
| १२]१४-२२ पाकमोडीया स्ट्रीट | सी १-२ | १२७ |
| १३]१२ याकुब स्ट्रीट | सी १-२ | १३३ |
| १४]२१-२३- शेरी पठाण स्ट्रीट | सी १-२ | १३९ |
| १५]२७-२७ अ सैफी ज्युबिली/४९-५८ बाप्टी रोड | सी १-२ | १४३ |
| १६]१२०-१२२ बारा इमाम रोड | सी १-२ | १५५ |
| १७]११४-११६ दागारी मोहल्ला. | सी १-२ | १७५ |
| १८]१४२-१४२ अ बापू खोटे स्ट्रीट | सी १-२ | १७९ |
| १९]३८ बापू खोटे स्ट्रीट | सी १-२ | २६५ |
| २०]६७-७१ शेरीली पठाण स्ट्रीट | सी १-२ | २७१ |
| २१]१६७-१७१ बारा इमाम रोड | सी १-२ | २८५ |
| २२]१८-२०ला भोईवाडा. | सी १-२ | १५७ |
| २३]१४ भाई जीवनजी लेन. | सी ३-४ | १३१ |
| २४]२९४ अ काळबादेवी रोड. | सी ३-४ | १४१ |
| २५]५४ जो सिताराम पोदार मार्ग. | सी ३-४ | १४५ |
| २६]५४-५६ रामवाडी केव्हल x लेन नं. १ | सी ३-४ | १४७ |
| २७]६-६अ वेलींग्टन स्ट्रीट | सी ३-४ | २४७ |
| २८]९ वेलींग्टन स्ट्रीट, धोबी तलाव. | सी ३-४ | २५३ |
| २९]२२२ जे.के. केव्हेल x लेन. | सी ३-४ | २५५ |
| ३०]३० दुतारी पोफळ वाडी. | सी ३-४ | २६७ |
| ३१]३७९ हैद्रे बिल्डींग, जे.एस.एस. रोड | सी ३-४ | २७३ |
| ३२]७ वेलींग्टन स्ट्रीट. | सी ३-४ | २४९ |
| ३३]३०५-३०७ एस. व्ही. पी. रोड. | डी १ | २४३ |
| ३४]२७बी खोताची वाडी. | डी १ | २६९ |

29



| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| ३५] | १३ बोरभाट लेन. | डी१ | २७९ |
| ३६] | ४६ अ सदाशिव x लेन. | डी१ | २९१ |
| ३७] | २०-२२ खांबाटा लेन. | डी२ | १५९ अ. |

उत्तर परिमंडळ.

| | | | |
|---|---|---|---|
| ३८] | २०-२२ ससेक्स रोड. | ई१ | १२३ |
| ३९] | २६३ मधुहंस . डॉ. ॲनी बेझंट रोड. | फा/द. | १२१ |
| ४०] | ३६-४२ हाजी नुरानी बिल्डींग जगन्नाथ भातणकर मार्ग. | फा/द. | २७७ |
| ४१] | २९-ई जाफर बोरी चाळ, वीझोवाडी. माहिम [द.]. | फा/उ. | १६३ |

४१

आगे पहा.

(१२८)

23

## परिशिष्ठ "ब"

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दि. २५.५.९३ रोजी झालेल्या ७ व्या बैठकीत मंजुरी दिलेली सुधारीत अंदाजपत्रके.

| क्र. इमारतीचे नांव. | विभाग. | पृ. क्र. |
|---|---|---|
| **दक्षिण परिमंडळ.** | | |
| १) १४९-१५१ पेरीन नरीमन स्ट्रीट. | अ | ३०९ |
| २) ३ नौरोजी होल रोड. | ब | १९७ |
| ३) १६-१८-२० सॅम्युअल स्ट्रीट | ब | २०१ |
| ४) २९७ एस. व्ही. पी. रोड | ब | २११ |
| ५) ९८-१०२-११६ भाजीपाला लेन. | ब | २९९ |
| ६) ५५-६१ सिताराम पोतदार मार्ग. | सी ३-४ | १८१ |
| ७) ५३-५५ मुगभाट x लेन. | डी १ | १८९ |
| ८) २ नवलकर लेन. | डी १ | १९३ |
| ९) १९६ राजाराम मोहन रॉय मार्ग. | डी १ | २१५ |
| **उत्तर परिमंडळ.** | | |
| १०) १८ गोपाळ भुवन, चम्हार x लेन. नेरपार्क. | फ/द. | २०५ |
| ११) १६७ अ रेडी मनी टेरेस, डॉ. अॅनी बेझंट रोड. | फ/द. | २९५ |
| १२) २१८-२२० सिद्धिवाडी, "अ" ब्लॉक. डॉ. बा. आंबेडकर मार्ग. | फ/द. | ३०५. |
| १२ | | |

सचिव
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.

सभापती
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.